ISSN 2229-6190
RNI. MAHMUL02937/2010/35848

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for Social Sciences

# SOCIAL GROWTH

CHIEF EDITOR

DR. BALAJI KAMBLE

Scanned by CamScanner

RNI. MAHMUL02937/2010/35848

IMPACT FACTOR - 2.03

ISSN 2229-6190

SOCIAL GROWTH

Issue : XI, Vol. IV, Nov. 2015 To April 2016

# INDEX



| Sr. No. | Title of Research Paper | Author(s) | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | India's Strategic Culture and India's National Security | Dr. L. P. Wagh | 1-13 |
| 2 | Cyclonic Storms in India | Ganesh P. Pawar | 14-18 |
| 3 | Roman Costume | Rekha B. Lonikar | 19-24 |
| 4 | Customary Practices & State Regulation- Child Marriage | Atul D. Kurane | 25-31 |
| 5 | Integration and Testing of Smart Class Room in Higher Education for English Teaching | Dr. Savita Gire | 32-42 |
| 6 | मराठेकालीन विधवा स्त्री | डॉ.आर.एम.साळुंके | 43-49 |
| 7 | महात्मा गांधी यांचे विधी व्यवसायविषयक मत | सुवर्णा उमाकांत टेंकाळे (वाले) | 50-55 |
| 8 | महिला सबलीकरण व शासकीय प्रयत्न | डॉ. गोविंद यमलवाड | 56-60 |
| 9 | महात्मा बसवेश्वरांचे देहालया विषयीचे विचार | डॉ. रत्नाकर बाबूराव लक्षटे | 61-65 |



Scanned by CamScanner

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 2.03
SOCIAL GROWTH
ISSN 2229-6190
Issue : XI, Vol. IV, Nov. 2015 To April 2016


9

# महात्मा बसवेश्वरांचे देहालया विषयीचे विचार

**डॉ. रत्नाकर बाबूराव लक्षटे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
देगलूर महाविद्यालय,
देगलूर, जि.नांदेड

***Research Paper - Political Sci.***

भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे. भारतात बौध्द, जैन, शिख, लिंगायत, इस्लाम, ख्रिश्चन असे विविध धर्म व पंथ गुण्यागोविंदाने एकत्र नांदताना दिसतात. ते आपले स्वतंत्र तत्वज्ञान घेवून उगम पावले आहेत. यातील कांही धर्म ईश्वर मान्य करतात तर कांही निरिश्वरवादी आहेत. ईश्वराचे अस्तित्व मान्य केलेल्या प्रत्येक धर्माने सामान्यत: देव - देवालय, स्वर्ग - नरक, आत्मा, पुनर्जन्म या विषयी चिंतन केल्याचे जाणवते. आस्तिक असलेल्या सर्व धर्मानी या चराचर सृष्टीत ईश्वराचे अस्तित्व ओतप्रोत भरले आहे, असे प्रतिपादन करतानाच पुन्हा त्या ईश्वराला विशिष्ट नावाच्या चार भिंतीत बंदिस्त केले आहे. त्यासाठी मंदिर, मस्जिद, गुरुव्दारा चर्च इत्यादी निर्माण केले ओहत. ही सर्व त्या त्या धर्माची प्रार्थना स्थळे म्हणून निर्माण झाली असली तरी कालांतराने त्यात अनेक विकृती निर्माण होऊन ही ठिकाणे मौलवी, भटजी, पुरोहीत, पुजारी यांची सत्ताकेंद्रे बनली आहेत. ज्या मंदिर, मस्जिद, चर्च, गुरुव्दारातून विश्व कल्याणाची प्रार्थना केली जाते. त्या केंद्रातून मानवतेला नष्ट करणारे कारस्थान रचले गेले आहे. अशा शोषित पुरोहीत व्यवस्थेला उलथून टाकण्यासाठी मंदीर, मस्जिद, चर्च, गुरुव्दारा आणि धर्मगुरु यांच्या विरोधात दंड थोपटुन बंड करण्याचे धाडस महात्मा गौतम बुध्द, संत क़बीरासह मध्ययुगात १२ व्या शतकातील समाजसुधारक महात्मा बसवण्णा मादरस हे अग्रस्थानी होते.

महात्मा बसवण्णांच्या नेतृत्वाखाली जगातील प्रथम लोकसंसद असलेल्या अनुभव मंटपात शरण व शरणींनी स्वत:च्या अनुभाव मंथनातून जे साहित्य निर्माण केले तेच वचन साहित्य होय. वचन साहित्य हे स्वअर्जित साहित्य असून एकाचवेळी, एकाचस्थळी व एकाच्या नेतृत्वाखाली ७७०

शरण व शरणींच्या अनुभवांतून तयार झालेले साहित्य होय. बसवादी शरणांनी देवाच्या अस्तित्वाखाली मंदीर, मठ असे स्थावर काहीही निर्माण केले नाही. आपल्या देहातच त्या चैतन्याचे निवासस्थान असल्याचे सांगून देह हेच देवालय असल्याचा जयघोष त्यांनी केला आहे.

समाजसुधारक महात्मा बसवण्णा आणि समकालीन शरणांनी समाजातील अनेक अनिष्ठ रुढी परंपरेच्या बुरुजावर हल्ले केले. ते नेस्तनाबूत करण्यासाठी आयुष्यभर संघर्ष केला. पुरोहितशाहीच्या उच्चाटनासाठी पुरोहितांची बाजारपेठ बनलेल्या देवालयावर शरणांनी जोरदार हल्ला केला आहे. अल्लमप्रभु आपल्या खालील वचनातून अत्यंत क्रांतीकारी प्रश्न विचारतात, **देहामध्ये देवालय असता, आणखी एक देऊळ का ? गुहेश्वरा तू जर दगड झालास, तर मी कोण ?**

अल्लमप्रमुंच्या या प्रश्नाने तत्कालीन प्रस्थापितांचे धाबे दणाणले. वर्तमानात मंदीर, मश्जिदीच्या निर्मितीच्या संघर्षात व्यस्त असणाऱ्यांना हे मार्मीक आहे. बसवादी शरणांचे हे आंदोलन म्हणजे देवालये आणि त्यावर जगणारी बांडगुळं यांना दिलेले आव्हानच होते. देवालये बहुजन समाजाच्या शोषणाचे केंद्रस्थान होते, आजही आहेत व पुढेही राहतील. प्रबोधनकार ठाकरे देवळाचा धर्म आणि धर्माची देवळे या पुस्तकात म्हणतात देवायल म्हणजे सांस्कृतिक दहशतवाद पसरविणाऱ्या ब्राम्हणांना लपण्याचे अड्डे होत. अशा अडयाचा आधार घेवुन असहिष्णुता माजवणाऱ्यांची संख्या भारतात वाढत आहे. विशेषतः वर्तमानातील मोदी सरकारच्या काळात त्याचा अधिक सुळसुळाट झाल्याचे जाणवते. ज्याचे प्रत्यय डॉ.नरेंद्र दाभोळकर, कॉ.गोविंद पानसरे व डॉ.एम.एम.कलबुर्गे यांच्या हत्येतुन स्पष्ट जाणवते. बहुजन समाजाच्या श्रमातून व पैशातून निर्माण झालेल्या देवळात त्यांच्या गुलामीचे व दारिद्र्याचे कारस्थान असंहिष्णुतावादयांनी रचले आहे. आजही भारतात विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना व मंदीर निर्मितीचे राजकारण करुन जनतेच्या डोळयात धुळफेक करत आहे. हा धोका बसवादी शरणांनी १२ व्या शतकातच ओळखला होता आणि त्यांच्या विरोधात जे जोरदार आंदोलन उभारले होते ते आंदोलन देहालय संस्कृतीचे आंदोलन होते.बसवण्णांनी आपल्या एका वचनातून देहालय संस्कृतीचे सुंदर रुप चित्रित करतात.सधन बांधिती शिवालय, देवा गरिब मी काय करु ? देहच माझे देवालय, देवळाचे खांब माझे पाय,मस्तक हे सूवर्ण कळस, स्थावर पावे नाश, जंगम अविनाश, कूडलसंगमदेवा. या वचनातून बसवण्णांनी स्थावर देवालय संस्कृती नाकारुन देह हेच देवालय असल्याचा निर्वाळा दिला आहे. म्हणजे देऊळ ही संस्कृती प्रस्थापितांनी प्रस्थापितांच्या हितसंवर्धनासाठी निर्माण केली नाही. Health is Wealth हा संदेश बसवेश्वरांनी वरिल वचनातुन दिला. गरिबांनी देऊळाच्या प्रवेशातील संघर्षात स्वतःला गुंतवुन घेऊ नये. देहासच देवालय मानावे, मानवाच्या प्रगतीचे, विकासाचे रहस्य हे त्याच्या शरिर संपत्तीत असते. शरीर समृध्दी हीच त्याची सर्वात मोठी संपत्ती आहे. महात्म बसवण्णांच्या या मानव केंद्रीत विचारधारेस तत्काळात व आज समाज अक्षरशः डोक्यावर घेत आहे.

Scanned by CamScanner

देहालय संस्कृतीचे मूळआधार इष्टलिंग होय. बसवादी सर्वच शरणांनी देवालय आणि पुरोहीत यांचा तीव्रपणे निषेध केला. इष्टलिंग स्वरुपातील परशिव त्यांनी अत्यंत सहजपणे स्विकारला. इष्टलिंग शरण संस्कृतीचे अत्यंत महत्वाचे वैशिष्टय होय. महात्मा बसवेश्वरांची देव (ईश्वर) संकल्पना अत्यंत पुरोगामी आणि अद्‌भुतपर्ण आहे. महात्मा बसवेश्वरांनी इष्टलिंग रुपात स्विकारलेला परशिव म्हणजे त्यांच्या ठिकाणी असलेले ज्ञान, चैतन्य व जाणीव होय. त्या जाणीवेलाच त्यांनी कुडलसंगदेवा हे अंकित नाम वापरले. आपण मात्र कूडलसंगमदेवा म्हणजे कूडलसंगम क्षेत्रातील स्थावर शिवलिंग असा अर्थ घेतो, इथेच आपली गल्लत होते.

महात्मा बसवेश्वरांच्या अनुभाव चिंतनातून इष्टलिंगाचा आविष्कार झाला. इष्टलिंग हे समतेचे प्रतिक आहे. आजचे देवालय विषमता , शोषण, कर्मकांडाचे केंद्रबिंदु आहे. इष्टलिंग धारण करणारे सर्वजण लिंगायत असून त्यांच्यात कुठलीच भिन्नता, अस्पृश्यता,विटाळ, सुतक नाही. लिंग देही सदा शुचीर्भुत अंगावर लिंगधारण करणारा सदैव पवित्रच असतो. स्थावर देवालयाची गरज वाटली नाही. आजही नाही. देवालयाचे समर्थन आत्मशांतीचे केंद्र म्हणुन करतात. बसवेश्वरांच्या काळातील परिस्थिती आजही आहे. इष्टलिंग देहावर धारण केल्यामुळे देह हेच देवालय झाले. इष्टलिंगाची पूजा स्वतःच करावी. त्यासाठी पुरोहीत/पुजारी यांचीही गरज नाही, असे सांगताना महात्मा बसवण्णा म्हणतात.

आपले रतिसुख, आपले भोजन आपुलिया हस्ते । कैसे परहस्ते केले जाय ॥ तैसे लिंगार्चना आपुलिया हस्ते । कैसे परहस्ते केले जाय ॥ असा मार्मिक प्रश्न महात्मा बसवण्णा उपस्थित करतात. महात्मा बसवण्णांच्या तात्विक चिंतनातून पुरोहिताची दलाली उघड होत जाऊन देहालय संस्कृती बीजारोपण होते. देहालयाचा विचार देवालय व शौचालयाच्या संकल्पनेपेक्षा कितीतरी पटीने अधिक श्रेष्ठ व अर्थपुर्ण आहे. त्यास सामाजिक, आर्थिक शाश्वत विकासाचे संदर्भ आहे. तसेच त्यास समतेचा व बंधुतेचा पदर आहे. स्थावर देवालय बांधणाऱ्या धार्मिक गवंडयास अल्लमप्रभु विचारतात. दगडाचे देवालय बांधून, दगडी देव करुन दगड दगडावर आदळयावर, देव कुठे गेला ? लिंग प्रतिष्ठापना करणाऱ्याला भयंकर नरक गुहेश्वरा. शरणांनी स्थावर शिवलिंगाऐवजी देहावरील इष्टलिंगाची उपासना सांगितली आहे. परंतु इष्टलिंग हेच देव नाही. इष्टलिंग हे परशिवाचे प्रतिक आहे. परशिवरुपी ईश्वरास साध्य साधण्यासाठी इष्टलिंग हे साधन आहे. इष्टलिंग हे आपल्या देहातील प्राणलिंगाचे स्वरुप आहे. लिंगायत संस्कृतीत इष्टलिंग, प्राणलिंग आणि भावलिंग हे तीन लिंग आहेत. प्राणलिंगाचे साकार रुप म्हणून इष्टलिंग आपल्या तळहातात बसवण्णांनी दिले आहे. गर्भातील अर्भकाचा पाळणा घालणे जसे शक्य नाही. त्याचप्रमाणे प्राणलिंगाची पूजा करणे शक्य नाही म्हणून इष्टलिंग दिले जाते. एवढे सांगायचे कारण म्हणजे इष्टलिंगाचे मूळ वास्तव्य ठिकाण आपला देहच आहे, म्हणून शरणांनी देह हेच देवालय, काया हेच कैलास म्हटले आहे.

Scanned by CamScanner

आपल्या देहाच्या माध्यमातून सुखलोलूप जीवन उपभोगणाऱ्या काही सनातनवादयांनी हा देह अपवित्र, अंमगळ म्हणून त्याची निर्भत्सना केली आहे. परंतु शरणांनी देहालाच कैलास मानले. एवढेच नाही तर शरणांनी देहाशी संबंधीत सर्व क्रिया नैसर्गिक मानल्या. त्याबद्दल गौरवभाव व्यक्त केला. प्रसाद कार्यास तुच्छ लेखू नये. प्रसाद कार्याची हेळसांड करु नये. शरणांनी उपवास, व्रत वैकल्ये, तीर्थयात्रा, जप, तप, अनुष्ठान, देह दंडण व शिर मुंडन हे सर्व नाकारले आहे. या शिवाय चार्वाक किंवा लोकायतांच्याही पुढे जाऊन शरण सांगतात की, इंद्रिय निग्रह केल्याने दोष लागतो पुढे त्रास देतात, भक्ताचे मन स्त्रीवर मोहित झाल्यास विवाह करावा म्हणजे शरणांनी इंद्रिय निग्रह, देहदंडण पुर्णपणे नाकारले आहे. आपण मात्र अंधश्रध्देच्या पोटी या प्रसाद कार्याची हेळसांड करित असतो. कित्येकजणांनी वाईट व्यसनाच्या आहारी जाऊन आपला अमूल्य देह गमावला. तंबाखु, गुटखा, मद्यपान करुन देहाचे पावित्र्य आणि मांगल्यत्व नष्ट केले.

आरोग्य हीच संपत्ती आहे. सामर्थ्य संपन्न व निरोगी समाजच देशाचे भविष्य उज्वल घडु शकतो. व्यक्ती आणि सृष्टीच्या कल्याणासाठी शक्तीशाली, निरोगी शरीराचा समाजच आवश्यक आहे. सुदृढता, सशक्तता हे जिवन तर दुर्बलता मृत्यू आहे. असे स्वामी विवेकानंद म्हणतात. सशक्त समाजाच्या निर्मितीसाठी आपण बसवादी शरणांच्या देहालय संस्कृतीचे आचरण केले पाहिजे. आपल्या आध्यात्मिक आणि भौतिक प्रगतीत शरीराचे साहय अत्यावश्यक आहे. शरीर समृध्दतेशिवाय आपण कोणतेही ध्येय साध्य करु शकत नाही. याबद्दल सकलेश मादरस नावाचे शरण आपल्या वचनात म्हणतात.

शरीरामुळेच गुरु लाभले म्हणजे ज्ञान (अरिवे गुरु) प्राप्त झाले. शरीरामुळेच लिंग लाभले म्हणजे परमात्म्याची कृपा संपादन करता आली. या शरीरामुळेच जंगमस्वरुपी समाजाची सेवा करता आली. शरीरामुळेच प्रसाद मिळाला. या शरीरानेच ही उच्च साधना करणे शक्य झाले. शरीराच्या माध्यमातून फक्त भौतिक साधनाच नाही तर अध्यात्मिकतेचे अतिउच्च शिखर गाठण्यासाठी ही शरीर हेच साधन आहे, असे षट्स्थल चक्रवर्ती चन्नबसवण्णां म्हणतात. शरीरामुळेच लिंग सुख, लिंगामुळेच शरीरसुख त्या लिंगाच्या संगतीच्या सुखामुळे, परमरसैक्य प्राप्त होई पहा. शरीर हेच साधन व साध्य आहे. त्यामुळेच लिंगायत संस्कृती अंग आणि लिंग हे एकच मानते. अंग-लिंग एक झाल्यामुळे इथै व्दैत भावना नष्ट होऊन अव्दैत भावाचे विशाल दर्शन घडते. अंग-लिंग वेगळे म्हणणाऱ्याला चेन्नबसवण्णां आपल्या वचनातून उत्तर देतात. त्या लिंगापासून (शुन्य) निर्माण झालेले शरीर, इंद्रिये, मन,प्राण वगैरे सर्व त्या लिंगाची उपकरणे त्या परवस्तुहुन वेगळे करणारे अज्ञानी लोक कुडलचेन्नसंगाला आवडत नाहीत. या वचनातून चन्नबसवण्णांनी अंग लिंगाचा सुरेख सामरस्यानुभाव स्पष्ट केला आहे. लिंगायत तत्वज्ञानानुसार अष्टावरण, पंचाचार आणि षट्स्थल यांच्या आचरणाने मनुष्य लिंगांग सामरस्य प्राप्त करु शकतो. मात्र त्यासाठी त्याला शरीर हेच साधन आहे. शरीराच्या

Scanned by CamScanner

RNI. MAHMUL02937/2010/35848 **SOCIAL GROWTH** IMPACT FACTOR - 2.03 ISSN 2229-6190
Issue : XI, Vol. IV, Nov. 2015 To April 2016 

माध्यमातून षट्स्थलाची साधना केल्यानंतर इंद्रिये लिंगेंद्रिये होतात. नाक - आचारलिंग, जिभ - गुरुलिंग, नेत्र - शिवलिंग, त्वचा - जंगमलिंग, कर्ण - प्रसादलिंग आणि ह्दय - महालिंग होते. अनुक्रमे ही इंद्रिये लिंगेद्रिये होऊन आपण स्वयलिंगी होतो. ते कसे म्हणजे अल्लमप्रभु एका वचनात म्हणतात. प्रवाहमान नदीस सर्वांगभर पाय भडकलेलया अग्नीस सर्वांगभर जिव्हा, वाहणाऱ्या वाऱ्यास सर्वांगभर हस्त गुहेश्वरा तुमचे शरण सर्वांगलिंगी अंग लिंगातील अभेदत्व हेच देहालय संस्कृतीचे परमोच्च वैभव आहे. बसवादी शरणांनी देहालय संस्कृतीचा पुरस्कार करुन पृथ्वीवर स्वर्ग निर्माण करता येतो असा आशावाद व्यक्त केला आहे. परंतु आजची वास्तवता अत्यंत भयावह वाटते. देहापेक्षा देवालयेच लोकांच्या श्रध्देचा विषय बनली. आपल्या देशात मंदिर-मस्जिद युध्द चालत आहे. आज आमचा देश भूकबळी, कुपोषण, उपासमार, झोपडपट्टी, अनारोग्य अशा समस्येने त्रस्त असताना दुसरीकडे देवाधर्माच्या नावावर लाखो रुपये उधळले जातात. ज्या देशात मनुष्य दोन वेळच्या जेवणासाठी ताव मारताना दिसतात. ज्या देशातील काही लोकांना पुरेसे वस्त्र मिळत नाही त्या देशातील देव मात्र भरजरी वस्त्र परिधान करुन सोने, चांदी, हिरे, माणिक, मोती यांचे मुकूट घालून सूवर्ण सिंहासनावर विराजमान होतात. ज्या देशात झोपडपट्टी सारखी समस्या सतावत असताना त्या देशात रंग महालासारखी देवालये उभारली जातात. अशा श्रीमंत देवाच्या देशात गरीब माणसे राहतात ही भारतीय समाजाची शोकांतिका आहे. आमच्या देशातील माणुसकीची विटंबना इथेच थांबत नाही. देवालयाच्या पावित्र्याचा बुरखा घालून पुरोहितवर्गाने तर अत्यंत अश्लीलपणा चालवला आहे. यांचे ज्वलंत उदाहरण म्हणजे देवदासी प्रथा होय. यातुन नैतीक आचरणच धोक्यात आले आहे. स्त्रीची शक्ती म्हणून पूजा करताना तिचे सौंदर्य चाटण्याचा मोह या पुरोहितांना होतो. दगडाच्या देवापूढे माणसे बळी दिले जातात, यापेक्षा मानवतेची विडंबना आणखी काय असू शकेल ? अशा अनैतिक चारित्र्यहिन संबंधाने बरबटलेल्या पुरोहितांच्या ताब्यात असलेल्या देवालय संस्कृतीचा पर्दाफाश करण्यासाठी आज बसवादी शरणांनी, संतानी सांगीतलेल्या देहालय संस्कृतीचे आचरण करणे काळाजी गरज आहे. देहालय संस्कृतीच्या आचरणाने देवालयाला दिली जाणारी देणगी, मानवी कल्याणासाठी वापरुन खऱ्या अर्थाने मानवतेचे राज्य निर्माण करु या.

## संदर्भ सूची

१. समाजसुधारक महात्मा बसवेश्वर - डॉ.अशोक मेनकुदळे.
२. Basweshwar & his Times - Dr.P.B.Desai
३. युग प्रवर्तक महात्मा बसवेश्वर - प्रा.भिमराव पाटील
४. परिवर्तनाचा महामेरु महात्मा बसवेश्वर - डॉ.सच्चिदानंद बिचेवार
५. बसव पथ

Scanned by CamScanner